**रयत शिक्षण संस्थेचे,**

**दहिवडी कॉलेज दहिवडी**

**महाविद्यालय अग्रणी योजने अंतर्गत**

**भाषा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, एन.सी. सी. आणि ग्रंथालय विभाग**

**यांचे संयुक्त विद्यमाने**

**माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जयंती निमित्ताने**

**वाचन प्रेरणा दिन**

## अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे दहिवडी कॉलेज दहिवडी मध्ये मंगळवार दिनांक १५ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयातील भाषा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, एन.सी.सी. विभाग, आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे मसुद्याचे वाचन करण्यात आले त्याबरोबरच महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ .अनिल दडस यांनी अध्यक्षस्थान भूषविले. अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना डॉ. अनिल दडस यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देवून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगितले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी श्री. के. एस. शिंदे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री विष्णू वाघेरे यांनी मांडले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील डॉ.अनुसया इमडे व कु. तेजस्विनी जाधव यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापक डॉ.मीरा देठे, एन.सी.सी. चे डॉ. शिवकुमार लेकुरवाळे, प्रा. अरुण कट्टे, प्रो. डॉ. गोविंदराव कांबळे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्पाधिकारी प्रा. हनुमंत कायंदे, ज्युनिअर विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी प्रा. ढाणे सर, प्रा. सौ. उज्वला मदने, प्रा.प्रकाश जमदाडे, डॉ. आनंद देढे वाणिज्य विभागातील डॉ. निलेश म्हेत्रे, डॉ. महेश बनकर, प्रा.अमोल खंडाळे, पत्रकार एकनाथ वाघमोडे त्याबरोबरच कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील १५० विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.




ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
LIBRARY
TAL.MAN.DIST.SATARA

प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा